# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 274/2022 दिनांकः 15.07.2022

## 1)घरफोडी :—

**नांदेड ग्रामीण :—** दिनांक 10.07.2022 रोजी चे 14.00 ते दि. 13.07.2022 चे 07.00 वा. चे दरम्यान, **एन.डी. 41, 12/5 जय भवानीनगर सिडको ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे मुलीस पुणे येथे नौकरी लागल्याने तिला सोडण्या करीता गेला असता अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करून एमआय कंपनीची 43 इंचीची एलईडी टीव्ही किंमती 5000/—रूपयाची जु. वा., कपाटातील 274 ग्रॅम चांदीचे बिस्कीट किंमती 17,400/—रूपयाचे, सोन्याचा दोन ग्रॅम वजनाचा तुकडा किंमती 3,400/—रूपये व नगदी 15,000/—रूपये असा एकुण 40,800/—रूपयाचा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी विजय मरोती गुंडाळे, वय 57 वर्षे, व्यवसाय टेलर रा. एनडी—41, 12/5 जय भवानीनगर सिडको नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 414/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/शिंदे, मो.क्र. 9511851737** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :—

**1)भोकर :—** दिनांक 09.07.2022 रोजी चे 15.00 वा. चे सुमारास, **सीताखंडी देवीच्या मंदिरा समोरून ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा स्पलेंडर कपंणीची मो.सा. क्रं. एम.एच.—26/डब्ल्यु—5344 किंमती 25,000/—रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी नागनाथ शंकर खुपसे, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. बोरवाडी ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 250/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1765 हनवते, मो.क्रं. 8329998933** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :—** दिनांक 13.07.2022 रोजी चे 05.45 ते दि. 14.07.2022 चे 06.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे न्यु सोनी किराणा दुकानाचे समोरून गोविंदनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा प्लेजर कपंणीची स्कुटी क्रं. एम.एच. —26/डब्ल्यु—5649 किंमती 25,000/—रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी गोविंद पि. व्यंकटराव येवले, वय 51 वर्षे, व्यवसाय न्यु सोनी किराणा दुकान गोविंदनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 242/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/631 देशमुख, मो.क्रं. 8668948219** हे करीत आहेत.

## 3)चोरी :—

**नांदेड ग्रामीण :—** दिनांक 14.07.2022 रोजी चे 03.00 ते 04.00 वा. चे दरम्यान, **संकल्प ट्रेडिंग कंपणी मार्केट यार्ड नवीन नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे शेडमधुन 60 कि. ग्रॅ. चे 06 प्लास्टीक पोते किंमती 21,000/—रूपयाचे चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी बालाजी दत्तराम कोसडे, वय 40 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. मगनपुरा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 267/2022 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2282 इब्राहीम, मो.क्रं. 9823252282** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :—

**1)भाग्यनगर :—**दिनांक 15.08.2020 ते दिनांक 25.06.2022 रोजी चे 12.30 वा. चे दरम्यान, **महाड व नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला स्वयपांक येत नाही, तु जास्त शिकलेली आहेस व फिर्यादीचे चारीत्र्यावर संशय घेऊन तीस शिवीगाळ व मारहाण करून तिचा शारिरीक व माणसीक छळ केला, व तु मला घटस्फोट का देत नाहीस म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 236/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/489 जुनगरे, मो.क्र. 8830464424** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :—**दिनांक 30.12.2015 ते दिनांक 08.11.2021 रोजी चे 23.00 वा. चे दरम्यान, **मौ. निलंगा व अंबिकानगर नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझ्या नवऱ्याचे नौकरीसाठी माहेरहुन पाच लाख रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीचा शारिरीक व माणसीक छळ करून मारहाण केले व पैसे नाही आणलीस तर ठिक आहे नाही तर जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 28 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 237/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/489 जुनगरे, मो.क्र. 8830464424** हे करीत आहेत.

**3)अर्धापुर :—** माहे मार्च 2021 ते माहे ऑक्टोबर 2021 चे दरम्यान, **मौ. नरसी नामदेव ता. जि. हिंगोली ह. मु. सुबा कॉलनी अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझ्या माहेरून आम्ही घेतलेल्या ट्रॅक्टरचे पैसे देणे आहे त्या करीता तु दोन लाख रूपये आन असे म्हणुन वारंवार फर्यादीचा शारिरीक व माणसीक छळ करून मारहाण केली व उपाशी पोटी ठेवले. पैसे नाही आणलीस जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 204/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री डी. एम. राठोड, मो.क. 9421296377** हे करीत आहेत.

## 5)अपघात :—

**रामतिर्थ :—** दिनांक 14.07.2022 रोजी चे 10.20 वा. चे सुमारास, **मौ. नरसी चांमुडा हॉटेल समोर देगलुर ते नरसी रोडवर ता. नायगाव जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे भुमा गणपत गायकवाड, वय 44 वर्षे, व्यवसाय मुनीम रा. बेळकोणी ता. बिलोली जि. नांदेड** हा चांमुडा हॉटेल मध्ये चहा फराळ करून बाहेर रोडवर आले असता आयचर कंटेनर क्र. आरजे –02/जीबी–0107 चे चालकाने आपले ताब्यातील कंटेनर हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन कट मारल्याने त्यात मयत हा गंभीर जखमी होऊन मरण पावला आहे. जोराची धडक देवुन यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी यशवंत सटवाजी गायकवाड, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. बेळकोणी ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरनं. 113/2022 कलम 279, 338, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री शेख लतीफ, मो.क्र. 9960161935** हे करीत आहेत.

## 6)फसवणुक :—

**इतवारा :—** दिनांक 14.07.2022 रोजी चे 14.50 वा. चे सुमारास, **में अन्सारी ट्रेन्डर्स बरकी चौक दुकान इतवारा नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून मे दामोदर जगन्नाथ मालपाणी संगमनेर अहमदनगर या कंपणीचे पॅकींग कव्हरचा कागद व रंगाचा वापर करून बनावट लेबल व रेपरचे बनावटी प्रिंटीं करून गाय छाप तंबाखु बिना परवाना बेकायदेशीररिपणे 4000/–रूपये किंमतीचा माल बाळगलेले मिळुन आले. तसेच ते शासनास मिळत असलेले महसुल (जीएसटी) बुडवुन कंपणीचे व शासनाची फसवणुक केली आहे. **फिर्यादी कैलास रामेश्वर सोमाणी, वय 51 वर्षे, व्यवसाय सेल्स ॲण्ड मार्केटींग मे. डी. जे. मालपाणी संगमनेर, अहमदनगर रा. ए/2/50 मंत्री चंडक कॉम्पलेक्स सम्राट चौक सोलापुर जि. सोलापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 178/2022 कलम 420, 468, 471, 482, 483, 486, 487, 34 भादवि सह कलम 51, 63 कॉपी राईट ॲक्ट कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो.नं. 02162–236510** हे करीत आहेत.

## 7)जुगार :—

**1)मुखेड :—** दिनांक 14.07.2022 रोजी 16.45 वा. चे सुमारास, **मौजे धामणगाव येथील मेनूबेग यांचे घराचे पाठीमागे मोकळया जागेत ता. मुखेड जि. नांदेड येथे**, यातील नमुद आठ आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तीरट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 11,780/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री भारत रमेश जाधव, ने. पोस्टे मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 217/2022 कलम (12) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2636 चिंचोरे, मो.क्र. 9075991793** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :—** दिनांक 14.07.2022 रोजी 20.10 वा. चे सुमारास, **शंकरराव चव्हाण चौक ते मालटेकडी गुरूद्वारा जाणारे रोडवर प्रियम फॅमीली ढाबाचे मागे नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 1420/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/बंडु पि. केशवराव कलंदर, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 243/2022 कलम (12) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2636 चिंचोरे, मो.क्र. 9075991793** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड